# लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ

## राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक अहवाल सत्र 2020-21

राष्ट्रीय सेवा योजना सत्र 2020 21 या वर्षात कोरोना काळात ऑनलाइन कार्यक्रमावर भर देण्यात आले होते.

**1)वृक्षारोपण:-** 9 सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी आपापल्या परिसरात वृक्षारोपण केले यात मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाल्या होत्या.

2) उद्बोधन:- राष्ट्रीय सेवा योजना यात प्रथम प्रवेश विद्यार्थिनींना राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे काय त्याचे कार्य याविषयी माहिती करून देण्यासाठी पाच सप्टेंबर रोजी ऑनलाइन उदबोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते यात माननीय प्राचार्य डॉ. दुर्गेश कुंटे यांनी राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे काय व विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व सांगितले ऑनलाईन झालेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थिनींनी उत्तम प्रतिसाद दिला.

4) 2 ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून विद्यार्थिनींना आपला परिसर स्वच्छ करण्यासाठी प्रेरित करण्यात आले त्यात जवळपास 170 विद्यार्थिनींनी सहभाग घेतला व परिसर स्वच्छता करताना चे छायाचित्रे व्हाट्सअप वर पाठविले.

5) 12 जानेवारी युवक दिनानिमित्त ऑनलाइन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून डॉ. ताराचंद कंठाळे उपस्थित होते कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माननीय प्राचार्य डॉ. दुर्गेश कुंटे उपस्थित होते डॉ. ताराचंद कंठाळे यांनी युवकांनी कठोर परिश्रम करून आपले ध्येय प्राप्त करावे व आपले ध्येय प्राप्त होईपर्यंत प्रयत्न करावे असे आव्हान केले माननीय प्राचार्य डॉ. कुंटे यांनी युवक देशाचे भविष्य घडवू शकतात व क्रांती घडवून आणण्याचे सामर्थ्य त्यात आहे तेव्हा युवक हा सक्षम असला पाहिजे असे आपले मत मांडले.

Scanned with CamScanner

6) संत गाडगेबाबा जयंती निमित्त संत गाडगेबाबा यांचे जीवन व कार्य या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय प्राचार्य डॉ. कुंटे होते त्यांनी खरा संत कसा असतो हे गाडगेबाबा यांच्या चरित्रातून त्यांच्या कार्यातून दाखवून दिले तर प्राध्यापिका दर्शन सायम यांनी संत गाडगेबाबा यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला कार्यक्रमाचे संचालन डॉ. संतोषकुमार गाजले कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राध्यापिका स्मिता मोहोड यांनी मानले.

7) **रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त महाविद्यालयात जिल्हा वाहतूक शाखा, यवतमाळ. जिल्हा विधी सेवा यवतमाळ आणि लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ.** यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाला माननीय श्री एम आर शेख सचिव जिल्हा विधी सेवा व माननीय श्री सतीश चवरे प्रभारी पोलिस निरीक्षक यांनी मार्गदर्शन केले कार्यक्रमाला माननीय प्राचार्य डॉ. दुर्गेश कुंटे यांची विशेष उपस्थिती लाभली होती.

7) **17 नोव्हेंबर 2020** रोजी कोरोना काळात रक्ताची अधिक गरज लक्षात घेता रक्तदान करण्यास व लोकांना प्रोत्साहित करण्याकरिता रक्तदानाचे महत्त्व सांगणारे फलक व इतर सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आले व त्याद्वारे रक्त दान करण्याचे आवाहन नागरिकांना केले गेले.

8) **8 मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त** राष्ट्रीय सेवा योजना व महिला तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने एक मुलगी असलेल्या पालकांना प्रमाणपत्र देऊन महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला **सिंगल गर्ल चाइल्ड** या शीर्षकांतर्गत संपन्न झालेल्या या कार्यक्रमात तब्बल 52 पालकांचा सत्कार करण्यात आला.

9) **23 मार्च जागतिक तापमान वाढ दिनानिमित्त** फेसबुक लाईव्ह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले तापमान वाढीचे पशुपक्ष्यांवर होणारे परिणाम या विषयावर डॉ. प्रवीण जोशी यांचे पीपीटी द्वारे **यवतमाळ परिसरातील जंगलाचा झालेला ह्रास व त्याचा होणारा परिणाम** यावर मार्गदर्शन केले गेले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी

Scanned with CamScanner

माननीय प्राचार्य डॉ. दुर्गेश कुंटे हे होते तसेच सर्व प्राध्यापक या कार्यक्रमातला उपस्थित होते तर फेसबुकच्या माध्यमातून महाविद्यालयाच्या जवळपास तीनशे विद्यार्थिनींनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला.

10) राष्ट्रीय सेवा योजना, आय क्यू ए आर तर्फे पाच मे ते पाच जून पर्यंत नैतिक मूल्य संवर्धन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे ऑनलाइन आयोजन करण्यात आले यात तब्बल 270 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली

डॉ.संतोषकुमार गाजले
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी
यवतमाळ

प्राचार्य
Principal
Loknayak Bapuji Aney
Mahila Mahavidyalaya,
Yavatmal
लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ.